Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | Feb - 2016




# भाषेची शुद्धाशुद्धता

नवनाथ निवृत्ती लोंढे
सहयोगी प्राध्यापक, इंग्रजी विभाग प्रमुख,
द. भै. फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

**प्रस्तावना :**

भाषेची शुद्धता कशी राखली जाते किंवा राखली जावी हा भाषाशास्त्रज्ञ Linguists यांच्या समोर पूर्वीपासूनच उपस्थित झालेला प्रश्न आहे. कोणतेही भाषा असो, त्यामध्ये तीन प्रामुख्याने घटक अनुस्यूत असतात-१. अर्थ २. शब्द ( किंवा वाक्य ) आणि ३. वाणी. एका बाजूने शब्द किंवा वाक्य आणि अर्थ यांचा स्वाभाविक संबंध natural logical असतो आणि प्राचीन वैदिक ऋषी-व्याकरणकार-भाषाशास्त्रज्ञ अर्थ आणि शब्द यांचा स्वाभाविक संबंध अनुभवाने उधृत करतात दुसऱ्या बाजूने शब्द, वाक्य आणि वाणी यांचा संबंधसुद्धा असाच स्वाभाविकच असतो. म्हणजेच शब्द, वाक्य आणि अर्थ यांचा स्वाभाविक संबंध जाणून तो व्यवस्थित राखणे आणि दुसऱ्या बाजूने वाणीद्वारे तो शब्द किंवा वाक्य जसा आहे तसा उच्चारला जावा, ध्वनित केला जावा जेणे करून शब्दार्थाला योग्यरीतीने ध्वनित जी करण्याची पद्धती आहे तिला कुठेही धक्का बसता कामा नये. कोणत्याही भाषेची शुद्धता ही या दोन पद्धतीने ओळखली, तपासली जावू शकते.



भाषेतील अशुद्धी मुख्यत्वेकरून या दोन अंगाने दिसून येते. शब्द आणि अर्थ यांच्यातील असलेला स्वाभाविक संबंध लुप्त होवून त्याजागी भाषेतील शब्द आणि त्यांचे अर्थ हे लोकपरंपरानुगत होत जातात आणि शब्द आणि अर्थ यांच्यातील स्वाभाविक संबंध नष्ट होऊन शब्द आणि अर्थ यांच्या अनुषंगाने भाषेमध्ये शिरलेली अशुद्धी जानिवेत येते. शब्द आणि अर्थ यांचा स्वाभाविक संबंध कसा असतो?

जिथे शब्दच अर्थाला परिपूर्णरीत्या अभिव्यक्त करतो. अर्थाचा बोध करून घेण्यासाठी शब्दाखेरीज अन्य कोणत्याही घटकावर अवलंबून राहावे लागत नाही. शब्दाचा उच्चार किंवा ओळख होण्याच्या क्षणातच तो शब्द अर्थाला सुद्धा प्रकाशित करून जातो. जसे संस्कृत भाषेतील कोणत्याही शब्दाच्या बाबतीत ही वस्तुस्थिती दिसून येईल. उदाहरण द्यायचे झाले तर `मनुष्य' हा शब्द घ्या. मनुष्य हा शब्द आपल्यासमोर येताक्षणीच मनुष्य म्हणजे मनन करणारा असा अर्थ बुद्धीमध्ये प्रकाशित होतो. कारण मनुष्य या शब्दामध्ये `मनन' हा धातू अनुस्यूत आहे. म्हणूनच माणसाला विचारशील प्राणी म्हटले आहे. जसे `महात्मा' हा शब्द घ्या. महान असा जो आत्मा असतो त्याला महात्मा असे म्हणतात.

महात्मा शब्दाचा अर्थ लक्षात घेण्यासाठी शब्दच मार्गदर्शक असतो. महात्मा या शब्दाचा अर्थ त्या शब्दातच आहे. शब्द आणि अर्थ यांचा असा स्वाभाविक संबंध असतो. जणू काय शब्द आणि अर्थ हे जसे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हा स्वाभाविक संबध अन्य कोणत्याही कारणामुळे ज्यावेळी लुप्त होतो त्यावेळी शब्द आणि अर्थ यांच्या स्वाभाविक संबंधाच्या अनुषंगाने भाषेमध्ये अशुद्धी दिसून येते जगातील बहुतांश भाषेच्या बाबतीत त्यातील शब्द आणि अर्थ यांच्या संबंधातील स्वाभाविक संपुष्टात येवून त्या लोकपरंपरानुगत होत राहिल्या. याचे तीन परिणाम दिसून येतात—१. एकच अर्थ व्यक्त करण्यासाठी जात, समूह, धर्म, देश, काल, गरजा आणि भाषा परत्वे अनेक शब्दाची रचना, निर्मिती झालेली दिसते. २. अर्थ अभिव्यक्त करण्यासाठी ज्या शब्दाची निर्मिती केली जाते तो शब्द एक लोकपरंपरा सोडली तर कोणत्याही अर्थाने अर्थाशी संबंधित नसतो. ३. अर्थ अभिव्यक्त करण्यासाठी ज्या ज्या शब्दाची निर्मिती केली जाते तो अर्थ आणि शब्द यांच्यामधील संबंध कधीच स्थिर नसतो. एक उदाहरणच द्यायचे झाले तर `कुत्रा' हा एक प्राणी आहे. कुत्र्यासंबंधी आपल्या मनात एक संकल्पना किंवा अर्थ असतो तो व्यक्त कण्यासाठी प्रत्येक भाषेत वेगळ्या शब्दाची निर्मिती झालेली आहे. भाषा आणि त्यामागे असलेला समूह, जात, धर्म, गरजा इत्यादी घटक लपलेले असतात. एकच अर्थ व्यक्त करण्यासाठी प्रत्येक भाषेत एक नवीन किंवा वेगळा शब्द आहे असे नाही, तर देशकाळानुसार तो विशिष्ट अर्थ व्यक्त करण्यासाठी त्या भाषेतील शब्द बदलेले आहेत. यावरून ऐवढेच लक्षात येते की, शब्द आणि अर्थ यांचा स्वाभाविक संबंध संपुष्टात येवून लोकपरंपरानुगत संबंध प्रस्थापित झाला आणि सर्वच लोकपरंपरा अस्थिर असल्याने शब्द आणि अर्थ यांच्यातील संबंध अस्थिर होतात. यालाच शब्द आणि अर्थ यांच्या संबंधाच्या अनुषगाने आलेली अशुद्धी म्हणता येईल

मी वर नमूद केल्याप्रमाणे शब्द आणि अर्थ यांच्या स्वभाविक संबंधाच्या अनुषगाने शुद्धता जशी सिद्ध होते तशीच ती शब्द किंवा वाक्य आणि वाणी, उच्चारण यांच्या अनुषंगाने तपासली जाते. वाचकांच्या समोर शब्द उपस्थित होण्याच्या क्षणीच अर्थाचे प्रकाशन होते. अगदी तद्वत शब्द ध्वनित होण्याच्या क्षणातच शब्दाच्या अर्थाचे प्रकाशन होते. इथे शब्द आणि शब्दाला ध्वनित करणारी वाणी यांच्या अनुषंगाने भाषेची शुद्धता लक्षात येते. ज्यावेळी वाणी शब्दाला योग्यरीतीने ध्वनित करू शकत नाही त्यावेळी वाणीच्या संदर्भात भाषेत मिसळलेली अशुद्धता असते. वाणी भाषेला एका अर्थाने मूर्त स्वरूप देत असते. भाषेला मूर्त स्वरुपात आणणाऱ्या वाणीचे स्थान अनन्यसाधारण आहे. वाणीमध्ये जर काही दोष असतील तर भाषेतील शब्द आणि त्याचा अर्थ व्यवस्थित ध्वनित होत नाही. भाषेला मूर्त स्वरुपात प्रगट करणारी जी वाणी आहे तिला वैखरी असे म्हणतात. ही वैखरी शरीर आणि प्राणनक्रियेशी संबंधित असते. शरीर किंवा प्राणन क्रियेमध्ये जर काही स्वाभाविक किंवा व्यक्तिप्रमादरूप दोष असतील तर वैखरी वाणी शब्दाला व्यवस्थित ध्वनित करू शकत नाही. वैखरी वाणीमध्ये शरीर इंद्रियामध्ये विशेषतः जीभ हा अत्यंत महत्वाचा शरीर अवयव आहे. शरीर अवयव असलेल्या जिभेला क्रियान्वित करणारी प्राणन क्रिया मंद असेल तर जिभेला जाड्यता येवून शब्दाचे उच्चारण व्यवस्थित होत नाही. परिणामतः वाणीदोष आणि भाषा अशुद्धी. शब्दाचा उच्चार व्यवस्थित न करू शकणारी, बोबडे बोलणारी मुले किंवा माणसे यांच्या संदर्भात असे दिसून आले आहे की, जीभेमध्ये असणारी प्राणनक्रिया मंदावलेली असते. त्यामुळे जिभेला जाड्यता येवून जीभ शब्दाचा व्यवस्थित उच्चार करू शकत नाही. जिभेला कार्यान्वित करणारा मेंदूचा जो भाग आहे तो जर disturb किंवा damage झाला असेल तर त्याचा परिणाम जिभेवर होऊन वाणीदोष speech disorder संभवतो. वाणीदोष, जिभेला येणारी जाड्यता व्यक्तीच्या मानसिक स्थितीशी सुद्धा संबंधित असते व्यक्तिच्या मनावर ज्यावेळी खूप ताण-तणाव आलेला असतो त्यावेळी तो

मानसिक ताण प्राणाच्या माध्यमातून शरीर इंद्रिये-जिभेवर परिणाम करतो. याची व्यक्ती मानसशास्त्राने सविस्तर चर्चा सुद्धा केली आहे. हा वाणीच्या अनुषगाने असणारा स्वाभाविक दोष झाला.

वाणीमध्ये दिसून येणारा व्यक्तिप्रमादरूप दोष सुद्धा खूप निर्णायक ठरतो. वाणीचा आणि व्यक्ती घेत असलेल्या अन्न-जलाचा, व्यक्ति करीत वेगवेगळ्या व्यसनांचा खूपच जवळचा संबंध आहे. राष्ट्गुरू समर्थ श्रीरामदासांनी असे म्हटले आहे: `जैसे घ्यावे अन्न |तैसे व्हावे मन ||१|| जैसे घ्यावे पाणी |तैसी व्हावी वाणी ||२||' वाणीला शुद्ध ठेवण्यासाठी व्यक्तीला आहार-विहाराचे नियम सांगितलेले आहेत. परंतु व्यक्ती त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो आणि वाणीचा दोष जडतो वैखरी वाणीद्वारे ध्वनित केले जाणारे शब्द व्यवस्थित उच्चारले जावे म्हणून वाणीला अशुद्ध बनविणाऱ्या घटकापासून व्यक्तिने दूर राहिले पाहिजे शब्दाला व्यवस्थित ध्वनित करण्याचे ज्यांचे कार्य किंवा व्यवसाय असतो त्यांनी मांसाहार, मद्यपान करू नये. मांसाहार हा तमप्रधान घटक आहे आणि वाणीशी संबंधित असणारा शरीर अवयव म्हणजे जीभ आणि ती आहे क्रियाप्रधान. जिभेवर तमोगुणाचा प्रभाव असून चालणार नाही. अन्यथा जीभ शब्दाचा व्यवस्थित उच्चार करणार नाही. तंबाखू तत्सम पदार्थांच्या सेवनाने जीभ जड होऊन शब्दचा व्यवस्थित उच्चार करण्याच्या लायकीची राहत नाही. शिक्षकांनी मांसाहार आणि मद्यपान का करू नये? याचे कारण वाणी हे समाज, विद्यार्थी प्रबोधनाचे मुख्य साधन आहे आणि ती वाणी जर मांसाहार आणि मद्यपानाच्या सेवनाने प्रभावित झाली, जड झाली तर वाणीद्वारे प्रबोधन होऊ शकणार नाही. पाश्चात्य लोक त्यांच्या त्यांच्या भाषेच्या शब्दांचे सुद्धा उच्चार व्यवस्थित करू शकत नाही. एखाद्या शब्दाचा उच्चार करायला भारतीयांना जेवढी शक्ति energy खर्च करावी लागते त्यापेक्षा कितीतरी अधिक energy पाश्चात्यांना शब्दाचे उच्चार करण्यासाठी करावी लागते. याचे कारण ते डुकराचे आणि गाईचे मांस घेतात. डुकर आणि गाईचे मांस हे जलतत्व प्रधान असते. वाणी हि अग्नीतत्व प्रधान असते. डुकर किंवा गाईचे मांस घेतल्यावर शब्द उच्चारणासाठी आवशक असलेले जीभेमधील अग्नीतत्व मंदावते. जलतत्व अधिक प्रबळ होऊन जिभेला जाड्यता येते आणि परिणामतः शब्दाचा उच्चार व्यवस्थित होत नाही. पाश्चात्य राष्ट्रातील थंड हवामान हा सुद्धा घटक आहे. परंतु हवामान आणि जलतत्वप्रधान आहार हे घटक एकत्र येवून जीभ अधिक जड होते. त्यामुळे शब्दाचा उच्चार सहज होत नाही. जिभेला खूपच आड-वेडे घ्यावे लागतात. म्हणून ज्यांचा व्यवसाय वाणीला धरून आहे किंवा ज्यांना मंत्रपठण करावयाचे असते त्यांनी मांसाहार टाळावा असा साधा नियम सांगितलाजातो. परंतु दुर्दैवाने एखादा नियम पाळा असे म्हटले की, ज्यांनी नियम सांगितलेला असतो त्याच्यावर शोषकव्यक्ति म्हणून टीका होते ना !!! भगवान राजर्षी मनु महाराजाने असे पुष्कळ व्यक्ति आणि समाजहिताचे नियम सांगितले आहे. त्यांच्याविषयी समाजाचा आज काय दृष्टीकोन आहे? तर हा झाला वाणीमध्ये असलेला व्यक्तिप्रमाददोष.

वर नमूद केलेले दोनही प्रकारचे दोष संस्कृत भाषा ज्यांनी पुरस्कृन आणि प्रचलित करण्याचा प्रयत्न केला त्या भाषेमध्ये दिसून येत नाही. शब्द आणि अर्थ यांचा स्वाभाविक संबंध अबाधित ठेवला आणि शब्दाच्या उच्चारणासाठी वाणी शुद्धीवर भर दिला. शब्द उच्चारणाचा संबंध शब्द अर्थाशी असल्याने शब्द उच्चार बदलेले नाहीत. परिणामतः भाषा प्रथमपासून आहे तशी विशुद्ध स्वरुपात अनादी काळापासून चालत आलेली आहे.